# महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन

(संलग्नित : ए.आय.एफ.ई.ई. व ए.आय.टी.यू.सी.)
☎ २५९२१९१ (का)
९८२३०१९५३१ (मो)
नोंदणी क्र. ४३०९
नेल्सन चौक, सिताराम महाराज मंदीराजवळ, छावणी, नागपूर - ४४००१३
E-mail : msewfnagpur@gmail.com
मोहन शर्मा, अध्यक्ष


नागपूर दि.०७.०७.२०२६

प्रती,
मा.मुख्यमंत्री,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय मुंबई.

विषय:- महावितरण कंपनीचे विभाजन नवीन कंपनी स्थापनेचा निर्णय व आय पी ओ प्रक्रिया राबवण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या अधिकार क्षेत्रातील महावितरण वीज कंपनी ही राज्यातील ३ कोटी ४० लाख वीज ग्राहकांना आणि ४५ लाख शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात अखंड वीज पुरवणारी देशांतील अग्रगणी वीज कंपनी आहे. या कंपनीने ३ लाख किलोमिटरची वीज यंत्रणा उभारून राज्यातील ९९ टक्के प्रदेशाला वीज पुरवठा करण्याचे लक्ष्य गांठले आहे. या वीज कंपनीतील कर्मचारी अभियंते, अधिकारी यांनी जिवाचे रान करून ३ लाख कोटी रूपयाची मालमत्ता उभी केलेली आहे. अश्या आशिया खंडात नावाजलेल्या या कंपनीचे खासगीकरण होउ नये म्हणून झालेल्या राज्यव्यापी संपावेळी मा.मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांनी वीज कंपन्याचे कोणत्याही प्रकारचे खासगीकरण होणार नाही हे मान्य केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उर्जा मंत्रालयाने २९ एप्रील २०२६ रोजी शासन निर्णयानुसार महावितरण कंपनीचे विभाजन करून कृषी वीज वितरणाशी संबंधीत कार्याकरीता 'एम.एस.ई.बी.सोलर ॲग्रो पॉवर लि.' या नवीन कंपनीची व अकृषिक वीज ग्राहकाकरीता महावितरणची मुख्य कंपनी अश्या दोन कंपन्या करण्याचा आणि महावितरण कंपनीने Initial Public Offering (IPO) व्दारे भांडवली बाजारातून निधी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.

प्रस्तावित विभाजनानंतर व पुनर्रचनेनंतर कृषी वीज पुरवठ्याशी संबंधित सर्व व्यवसाय स्वतंत्र वितरण कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात येतील. स्वतंत्र कृषी वितरण संस्थेचे कार्य व उद्देश केवळ कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देणे असल्याचे शासनाच्या परिपत्रकात नमूद आहे.

महावितरण कंपनीचे विभाजन व पुनर्रचना करण्याचा निर्णय हा स्ट्रक्चरल बदल (STRUCTURAL CHANGE) असून त्याचा कामगार, अभियंत्ते व अधिकाऱ्यांच्या सेवाशर्तीवर बढती, बदली, जेष्ठता अशा अनेक विषयावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यासंबंधात शासन व व्यवस्थापणाने कामगार संघटनांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णयाने हा बदल प्रस्तावित केला आहे. विभाजनापुर्वी आजपर्यंत सर्व ३ कोटी ४० लक्ष वीज ग्राहकांना महावितरण कंपनीतील कर्मचारी, अभियंत्ते व अधिकारी यांचे मार्फत सेवा देण्यात येत आहे. महावितरण कंपनीच्या विभाजनानंतर त्यांत बदल करण्याचे शासनाने ठरवले

आहे. परिणामी ४५ लक्ष कृषी ग्राहकांना 'एम.एस.ई.बी.सोलर अॅग्रो पॉवर लि.' कंपनी मार्फत सेवा देण्याचे प्रयोजन असून त्यामुळे महावितरण मधील कर्मचारी, अभियंते यांची शहरी व ग्रामीण अशी विभागणी करावी लागेल. उर्वरित २ कोटी ९५ लक्ष अकृषिक वीज ग्राहकांना पहिली कंपनी सेवा देणार आहे. या बदलामुळे ग्रामीण व शहरी क्षेत्रात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीत बदल अपरिहार्य आहे. या संबंधात संघटनां बरोबर चर्चा करून व्दिपक्षीय settlement होणे आवश्यक असल्याची वर्कर्स फेडरेशनची आग्रही मागणी आहे. चंदिगढ सरकारने फेब्रुवारी २०२५ मध्ये पॉवर खाते एका खाजगी कंपनीला दिले. तेव्हापासून तेथील विद्युत कर्मचारी त्यांच्या सेवाशर्ती बदलल्या (जसे पेन्शन स्कीम, जबरदस्तीने रेटलेली VRS, वर्षांपासून कार्यरत कंत्राटी कामगारांना काढून टाकणे वगैरे) म्हणून संघर्ष करत आहेत. ते टाळण्यासाठी, महावितरण मधील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीत बदल होणार नाही याबाबत संघटनांशी चर्चा करून व्दिपक्षीय settlement ही कायदेशिर आवश्यकता सुध्दा टाळता येणार नाही. मागील कांही काळापासून महावितरणचे व्यवस्थापणात एकतर्फी निर्णय घेण्याचा प्रधात होत चालला आहे. शासनाने २१ एप्रील २०२६ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक निर्णय परिपत्रकात महावितरण कंपनीची पुनर्रचना, शासन हमी, कर्ज दायित्वाची स्विकृती, कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन, हस्तांतरण, सुचीबध्दीकरण, आय पी ओ ची तयारी या सर्व विषयावरील निर्णयांचे विस्तृत स्पष्टीकरण आहे मात्र संघटनांची या बदलाबाबत मान्यता व विभाजित कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीबाबत सविस्तर उल्लेख करण्याचे टाळले गेले आहे.

**<u>आय पी ओ ला संघटनेचा विरोध कां?</u>**

महावितरण कंपनीचे विभाजन करून कृषी वीज ग्राहकांकरीता वेगळी कंपनी स्थापण करण्यात शासनाचा हेतू योग्य आहे असे जरी गृहीत धरले तरी आय पी ओ काढण्यात व महावितरण कंपनीला शेअर मार्केट मधे लिस्टींग करण्यामागे शासन व व्यवस्थापणाचा हेतू छूप्या मार्गाने भांडलवदार व खासगी कंपन्यांचा महावितरण कंपनीच्या आर्थीक व मॅनेजरील कामकाजात शिरकाव करण्याचा आहे.

आय पी ओ च्या माध्यमातून शासनाच्या अधिकार क्षेत्रातील, सार्वजानिक क्षेत्रातील महावितरण कंपनीची भुमिका कमी करण्याचा प्रयत्न आहे. त्या माध्यमाने भांडवलदार व त्यांच्या कंपन्यांना शिरकाव करण्याचा मार्ग मोकळा करून आर्थीक व्यवस्थापणात खासगी शेअर होर्ल्डर्सना चालना देण्याचा प्रयत्न आहे. उर्जा क्षेत्राचा प्रश्न हा केवळ आर्थीक नसून सामाजिक, राजकिय, रोजगार विषयासी संबंधित आहे. समाजातील सर्व घटकांना परवडणाऱ्या दरात आणि विश्वासार्ह वीज उपलब्ध करून देणे ही राज्याची जबाबदारी आहे. आय पी ओ मुळे सोशियल ऑब्लिगेशन प्रिंसीपल ला मर्यादा येणार आहेत.

आमच्या संघटनेचे हे धोरण आहे की महावितरण कंपनी ही केवळ एक कंपनी नसून राज्याच्या व राष्ट्राच्या विकासाची संस्था आहे. त्यांत जनतेच्या कराचा पैसा, कामगाराचे श्रम, अभियंते, अधिकारी यांचे ज्ञान व त्यागाचा वाटा आहे. या ऐतिहासिक वास्तवाचा शासन व व्यवस्थापणाने विसर पडू देउ नये. शेअर मार्केट मधील बाजारारित व्यवस्था राष्ट्रीय हितापेक्षा व्यवसायीक हिताला प्राधान्य देते हा धोका आहे. उर्जा क्षेत्राला पुर्ण पणे शेअर बाजाराच्या तर्कावर सोपवणे सार्वजानिक मालकी कमी करणे आणि नफ्याला सर्वोच्च प्राधान्य देणे हे राज्याच्या, जनतेच्या, वीज ग्राहकाच्या व कर्मचाऱ्यांच्या हिताचे नाही म्हणून वर्कर्स फेडरेशनचा आय पी ओ ला विरोध आहे. आय पी ओ मुळे सार्वजानिक क्षेत्रातील शासकिय महावितरण कंपनीतील मालकी कमी होउन खासगी भांडवलदार, कंपन्या यांचा शिरकाव होउन त्यामाध्यमाने खासगीकरणाच्या दिशेने टाकलेले हे पाउल आहे असे आम्ही समजतो.

सुरुवातीला शासन व व्यवस्थापन सरकारी कंपन्यांचा आय पी ओ काढताना, टक्केवारीने कमी म्हणजे ५%-१०% एवढेच शेयर सूचीबद्ध करतात. मग त्यानंतर टप्पाटप्प्याने एफ पी ओ काढतात व सरकारचे त्या कंपनीतील आणखी आणखी शेयर्स विकतात, आणि अशा तऱ्हेने काही काळातच खाजगी शेयर्स चे प्रमाण वाढते. सरकारी समभागांच्या (शेअर्सच्या) वारंवार झालेल्या विक्रीमुळे, २० सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील (PSEs) सरकारचा हिस्सा आधीच ६० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या श्स्टेट बँक ऑफ इंडिया मधील सरकारचा हिस्सा आता केवळ ५५.५% आहे. देशातील सर्वात मोठी वीज निर्मिती कंपनी असलेल्या नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (NTPC) मध्ये तो केवळ ५१.1% उरला आहे. असेच महावितरण आणि महापारेषण च्या बाबतीतसुद्धा होईल अशी आमची रास्त शंका आहे. शासन निर्णय क्रमांक ९.५ मध्ये महाराष्ट्र शासनाने स्पष्टपणे नमूद केले आहे कि सूचीबद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र शासनास offer for sale (OPS) च्या माध्यमातून हिस्सेदारीतील काही भाग टप्पाटप्प्याने विक्री करता येईल, याची आम्ही नोंद घेतली आहे आणि त्यामुळे आमची शंका नक्कीच रास्त आहे.

एकेकाळी सार्वजानिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या IDBI बॅकेच्या बाबतीत सरकारने सुरुवातीला IPO आणि FPO च्या माध्यमातून आपली मालकी सातत्याने कमी केली. त्यानंतर LIC या दुसऱ्या सार्वजानिक उपक्रमाला सर्वात मोठा भागधारक बनवून सरकारने आपली हिस्सेदारी ५१ टक्के पेक्षा खाली आणली. सरकारने पुढे जाहीर केले की आता त्यांची हिस्सेदारी ५१ टक्के पेक्षा कमी असल्याने IDBI बॅंक ही सार्वजनिक क्षेत्रातील बॅंक राहिलेली नाही आणि म्हणून तिचे खासगीकरण केले जावू शकते. महावितरणची अवस्था देखील अगदी अशीच होउ शकते. या कारणानेच आय पी ओ ला वर्कर्स फेडरेशनचा विरोध आहे.

अत्यंत महत्वाच्या या विषयावर व त्यामुळे होणाऱ्या परिणमाबाबत मा.मुख्यमंत्री यांचे स्तरावर त्रिपक्षीय वाटाघाटीचे आयोजन करावे ही वर्कर्स फेडरेशनची मागणी आहे.

आपले विनित

| मोहन शर्मा<br>अध्यक्ष | महेश जोतराव<br>कार्याध्यक्ष | कृष्णा भोयर<br>सरचिटणीस | अरूण मस्के<br>अतिरिक्त सरचिटणीस |
|---|---|---|---|

सत्यप्रतिलिपी अग्रेषित:

१) मा.प्रधान उर्जा सचीव, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता.
२) मा.अध्यक्ष व व्यवस्थाकिय संचालक, महावितरण, प्रकाशगड, बांद्रे यांना योग्य कार्यवाहीस्तव सादर.
३) मा.संचालक (वित्त), महावितरण, प्रकाशगड, बांद्रे यांना योग्य कार्यवाहीस्तव सादर.
४) मा.संचालक (मा.सं.), महावितरण, प्रकाशगड, बांद्रे यांना योग्य कार्यवाहीस्तव सादर.
५) वर्कर्स फेडरेशनच्या सर्व केन्द्रिय पदाधिकाऱ्यांच्या माहिती करीता.